# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 12 May 2024
## Time 7.10 AM to 7.20 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक १२ मे २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातल्या प्रचारतोफा थंडावल्या–राज्यात ११ मतदार संघात उद्या मतदान
- मणिबेली या राज्यातल्या पहिल्या मतदान केंद्रावर मजल दरमजल करत मतदान पथकं दाखल
- जालना, बीड आणि औरंगाबाद लोकसभा मतदार संघात मतदान प्रक्रियेसाठी प्रशासन सज्ज

आणि

- उष्माघात, अवकाळी पाऊस तसंच अपघाताच्या घटनांत विभागात नऊ जणांचा मृत्यू

****

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातल्या प्रचारतोफा काल थंडावल्या. या टप्प्यात राज्यातल्या औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर आणि शिर्डी या मतदारसंघांमध्ये, उद्या १३ मे रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी लागणारे साहित्य, साधन–सामुग्री मतदान केंद्रावर पोहोचवण्यात आली आहे. या अकरा मतदार संघात एकूण २९८ उमेदवार निवडणूक लढवत असून, एकूण २३ हजार २८४ मतदान केंद्रांवर, ५३ हजार ९५९ बॅलेट युनीट, २३ हजार २८४ कंट्रोल युनीट आणि २३ हजार २८४ व्हीव्हीपॅट यंत्राच्या आधारे, दोन कोटी २८ लाख १ हजार १५१ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

राज्यातलं पहिलं मतदान केंद्र असलेल्या नंदूरबार जिल्ह्यात मणिबेली या मतदान केंद्रावर काल मजल दरमजल करत मतदान पथकं तसंच पोलिस पथकं दाखल झाली. प्रारंभी रस्तामार्गे दीडशे किलोमीटर प्रवास, मग सरदार सरोवरातून तराफ्याने तासाभराचा प्रवास आणि त्यानंतर डोंगर सर करून मतदान पथक काल प्रत्यक्ष मतदानाच्या दोन दिवस आधीच मणिबेलीच्या मतदान केंद्रावर पोहोचलं. जिल्ह्यातल्या मुखडी, डनेल, बामणी आणि चिमलखेडी इथल्या मतदान केंद्रांवरही पोलिस पथकं काल पोहोचल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

विविध राजकीय पक्षांनी काल जाहीर सभा, द्वारसभा, पदयात्रांनी आपल्या प्रचाराची सांगता केली. गावागावांमधून मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी घेण्यावरही उमेदवारांचा भर दिसून आला.

महायुतीच्या बीड लोकसभा मतदार संघाचे उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच भाजप नेते उदयनराजे भोसले यांनी काल आष्टी इथं प्रचारसभा घेतली. तसंच परळी इथं पंकजा मुंडे यांची प्रचार सांगता सभा झाली. यावेळी महायुतीचे नेते महादेव जानकर, संभाजी पाटील निलंगेकर, प्रीतम मुंडे आणि धनंजय मुंडे, आदी मान्यवरांनी सभेला संबोधित केलं.

****

बीड लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी काल बीड इथं प्रचार सभा घेतली. शिरुर लोकसभा मतदार संघातले महाविकास आघाडीचे उमेदवार अमोल कोल्हे यांच्या प्रचारासाठी पुण्यात हडपसर इथंही शरद पवार यांनी काल जाहीर सभेला संबोधित केलं.

****

काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनीही काल नंदुरबार इथं महाविकास आघाडीचे उमेदवार गोवाल पाडवी यांच्या प्रचारार्थ सभा घेतली.

****

छत्रपती संभाजीनगर इथं महायुतीचे उमेदवार संदिपान भुमरे तसंच महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांच्या प्रचारार्थ त्यांच्या समर्थकांनी काल शहरातून दुचाकी फेऱ्या काढल्या. दोन्ही बाजूंचे समर्थक क्रांती चौक इथं समोरासमोर आले असता, जोरदार घोषणाबाजीमुळे काही काळ तणाव निर्माण

झाला होता, मात्र पोलिसांनी मध्यस्थी करून परिस्थिती पूर्वपदावर आणली. एमआयएमचे उमेदवार सय्यद इम्तियाज जलील यांनी काल फुलेनगर, एकनाथ नगर, मिलिंद नगर, नागसेन नगर आदी ठिकाणी पदयात्रा काढून जनतेशी संवाद साधला. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अफसर खान यांनी बेगमपुरा भागातून प्रचारफेरी काढली.

****

जालना लोकसभा मतदार संघात काल प्रचाराच्या शेवटच्या दिवशी उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींनी प्रचार फेऱ्यांसह मतदारांच्या गाठीभेटींवर भर दिला. महायुतीचे उमेदवार रावसाहेब दानवे यांच्या प्रचारार्थ आमदार संतोष दानवे यांनी भोकरदन शहरातून प्रचार फेरी काढली. महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. कल्याण काळे यांनीही मतदार संघातल्या विविध गावांमध्ये प्रचार फेरी, कार्नर बैठकांच्या माध्यमातून मतदारांशी संपर्क साधला.

****

भाजप नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शरद पवार तसंच उद्धव ठाकरे यांना कोणताही प्रस्ताव दिलेला नसून, माध्यमांना मोदी यांच्या विधानाचा अर्थ समजला नसल्याचं, भाजपचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते काल पुण्यात पत्रकार परिषदेत बोलत होते. निवडणूक निकालानंतर प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील, अशा आशयाचं विधान पवार यांनी केलं होतं, मोदी यांनी यावर बोलतांना, काँग्रेस पक्षात जाण्याऐवजी शरद पवार यांनी अजित पवार यांच्यासोबत जावं, तर उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात काम करावं, असा सल्ला मोदी यांनी दिल्याचं, फडणवीस यांनी स्पष्ट केलं. सामाजिक कार्यकर्ते डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्येप्रकरणी विशेष न्यायालयानं दिलेल्या निकालावर अपील करण्याचा निर्णय राज्याचा विधी आणि न्याय विभाग घेईल, असं फडणवीस यांनी सांगितलं

****

मराठवाड्यात जालना, बीड आणि औरंगाबाद लोकसभा मतदार संघात उद्या १३ मे रोजी मतदान होत आहे. मतदारांना मतदार यादीत आपलं नाव शोधण्यासाठी निवडणूक विभागानं आपल्या संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्याशिवाय मोबाईल एसएमएस सेवेद्वारेही मतदारांना ही सुविधा देण्यात आली आहे. यासाठी मतदारांनी मोबाईलच्या मेसेज बॉक्समध्ये इंग्रजीत ईसीआय स्पेस आणि त्यानंतर आपला मतदार ओळखपत्राचा क्रमांक लिहून १९५० या क्रमांकावर मेसेज

पाठवायचा आहे. या मेसेजच्या उत्तरात मतदार यादी क्रमांक आणि मतदार क्रमांक तत्काळ पाठवला जातो.

****

उद्याच्या मतदान प्रक्रियेसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासन सज्ज झालं आहे. एकूण २ हजार ०४० मतदान केंद्रांसाठी २० हजार ५२४ अधिकारी कर्मचारी प्रशिक्षणासह सज्ज आहेत. ही सर्व पथकं आज आपापल्या निर्धारित मतदान केंद्रांकडे रवाना होत आहेत. याशिवाय पोलिस प्रशासन, गृहरक्षक दल तसंच राखीव दलाच्या सहा तुकड्या बंदोबस्तावर तैनात आहे. जिल्ह्यात महिलांद्वारे संचलित १६ तर दिव्यांगांद्वारे संचलित १३ मतदान केंद्र असणार आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर पाळणाघराची सुविधा तसंच दिव्यांग मतदारांसाठी व्हिलचेअर्स उपलब्ध असणार आहेत. याशिवाय मतदार आणि कर्मचारी यांच्यासाठी एकूण दोन हजार तीनशे चौऱ्याहत्तर आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

****

जालना इथं अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी काल जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणुकीशी संबंधित विविध कक्षांना भेट दिली. तसंच औद्योगिक वसाहतीमधल्या मतमोजणी केंद्रासह स्ट्राँगरुमची पाहणी केली. आणि संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना केल्या. छत्रपती संभाजीनगर इथल्या व्यवस्थेचाही कुलकर्णी यांनी काल आढावा घेतला.

जालना लोकसभा मतदारसंघात एकूण दोन हजार ६१ मतदान केंद्रांवर १९ लाख ६७ हजार ५७४ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावतील. महिला अधिकारी संचलित सात सखी मतदान केंद्रं तर दिव्यांग अधिकारी संचलित सहा मतदान केंद्रं असणार आहेत.

****

बीड जिल्ह्यात जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे, यांनी काल मतदान केंद्रांवरच्या विविध सुविधांचा आढावा घेतला. या लोकसभा मतदारसंघात एकूण दोन हजार ३५५ मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्ष आणि त्यांचे तीन सहकारी तसंच राखीव अधिकारी कर्मचारी, अशा सुमारे साडे दहा हजार अधिकारी कर्मचाऱ्यांची सरमिसळ प्रक्रियेद्वारे काल निवड झाली. या सर्व पथकांना आज आपापल्या निश्चित मतदान केंद्रांवर रवाना व्हायचं आहे.

****

उष्माघात, अवकाळी पाऊस तसंच अपघाताच्या घटनांत विभागात नऊ जणांचा मृत्यू झाला आहे.

परभणी जिल्ह्यात वाढत्या उष्णतेमुळे एका आठवड्यात उष्माघातामुळे दोन बळी गेले. पूर्णा तालुक्यातल्या कातनेश्वर इथले ५५ वर्षीय भानुदास चापके यांचा काल दुपारी उष्माघाताने मृत्यू झाला. देवगाव दुधाटे इथल्या कचरुबा गुंडाळे यांचाही दोन दिवसांपूर्वी उष्माघाताने मृत्यू झाला.

****

बीड जिल्ह्यात धारुर तालुक्यात काल दुपारी झालेल्या अवकाळी पावसात टॉवर कोसळून आठ वर्षाच्या चिमुकलीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला तर चार जण जखमी झाले आहेत. तर अन्य एका घटनेत जिल्ह्यात घाटनांदूर इथं अंगावर वीज कोसळल्यानं एका तरुणाचा मृत्यू झाला.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात काल अनेक भागात सोसाट्याच्या वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाल्याचं वृत्त आहे.

****

जालना जिल्ह्यात टेंभुर्णी इथं काळेगाव कुंभारझरी रस्त्यावर पिकअप आणि दुचाकीच्या काल झालेल्या अपघातात, दुचाकीवरील तिघांचा जागीच मृत्यू झाला.

हिंगोली जिल्ह्यात औंढा नागनाथ इथं काल झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात दोन जण ठार झाले.

सोलापूर जिल्ह्यात सांगोला जत मार्गावर सोनंद गावाजवळ काल चारचाकीचा अपघात झाल्याने तीन महिला ठार झाल्या तर तीन महिला गंभीर जखमी झाल्या.

****

बुलढाणा जिल्ह्यातल्या जळगाव जामोद तालुक्यातल्या भेंडवळची राज्यभर प्रसिद्ध असलेल्या पीक पाण्याचा अंदाज वर्तवणारी घटमांडणी काल जाहीर झाली. यंदा राज्यात पिकपाणी आणि पाऊस चांगला राहील, असं अंदाज यावेळी वर्तवण्यात आला आहे.

****

नांदेड जिल्ह्यात अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर दोन बालविवाह रोखण्यास प्रशासनाला यश आलं. बालविवाह होणार असल्याची गोपनीय माहिती जिल्हा बाल संरक्षण कक्षास प्राप्त झाल्यानंतर संबंधित पथकाने हे विवाह थांबवून पालकांचं समुपदेशन केलं.

****

अमृतसर इथून सुटणाऱ्या अमृतसर नांदेड सचखंड एक्सप्रेसची आज रविवारची फेरी रद्द करण्यात आली आहे.

दरम्यान, रेल्वे रुळाच्या कामांसाठी जालना जिल्ह्यात कोडी आणि रांजणी रेल्वे स्थानकांदरम्यान लाईन ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे दर मंगळवारी आणि शनिवारी काही गाड्या उशिराने धावणार आहेत. तर धर्माबाद मनमाड ही गाडी आजपासून चार ऑगस्टपर्यंत धर्माबाद ते नांदेडदरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे.

****